स्था.१८/ब/अहवाल शाखा/वलेपअहवाल/न.क्र.१८३-(३)/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४.**

**<u>स्थायी आदेश क्र. ०१ /२०२०, दिनांक:</u>** 31 JAN 2020

विषय:- जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व नगर पंचायतीचे लेखापरीक्षण अहवालाबाबत प्रथम पुढील अभिप्राय निर्गमित करण्याबाबत.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ७(३) अन्वये आयुक्तांना प्रथम पुढील अभिप्राय कळविणेबाबतच्या तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत.

संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयांद्वारा प्रथम पुढील अभिप्राय विभागिय आयुक्तांना कळविण्यात येणाऱ्या मसुदयात एकवाक्यता आढळून येत नाही. या अनुषंगाने विभागिय आयुक्तांना प्रथम पुढील अभिप्राय कळविणेबाबत आदर्श नमुना विहित करणे प्रस्तावित आहे.

**आदेश:-**

सर्व ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवालांबाबत विभागीय आयुक्तांना कळवावयाचे प्रथम पुढील अभिप्राय सदर स्थायी आदेशासोबत जोडलेल्या विवरणपत्र १ अन्वये तयार करुन निर्गमित करावे. सदर आदेश सन २०१८-१९ चे लेखापरीक्षणापासुन लागु राहतील.

(सु.रा.भोसले)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:

१) विभागीय सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)
२) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जिल्हा कार्यालये (सर्व)

**विवरणपत्र - १**
**प्रथम पुढील अभिप्राय**
**नमुना**

कार्यालयाचे नाव
पत्ता
दिनांक

प्रति,
मा. विभागीय आयुक्त,
--------------- विभाग.

विषय:- जिल्हा परिषद / पंचायत समिती / नगरपालिका / नगर पंचायत --------चे २०-- - २०--- चे लेखापरीक्षण अहवालाबाबत प्रथम पुढील अभिप्राय
संदर्भ:- १. लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबतचे पत्राचा तपशिल
२. स्थानिक प्राधिकरणाकडून स्पष्टीकरण / अनुपालन प्राप्त झाले असल्यास याबाबतच्या पत्राचा तपशिल

महोदय,

जिल्हा परिषद / पंचायत समिती / नगरपालिका / नगर पंचायत (नाव) / (जिल्हा परिषद विभाग) चे सन २०-- - २०-- चे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ अन्वये लेखापरीक्षण अहवाल सदर संस्थेस पाठविण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १० (१) नुसार सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासुन चार महिन्याच्या कालावधीत (स्थानिक प्राधिकरणाचे नाव) यांनी लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे प्रथम अनुपालन ठरावासह या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

३. जिल्हा परिषद / पंचायत समिती / नगरपालिका / नगरपंचायत (नाव) यांचेद्वारा उपरोक्त नमुद लेखापरीक्षण अहवालाबाबत **प्रथम अनुपालन ठरावासह या कार्यालयास सादर करण्यात आले नाही / संदर्भ क्र. ०२ अन्वये प्रथम अनुपालन ठरावासह सादर करण्यात आले आहे.**

४. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १० (३) च्या तरतुदीनुसार उपरोक्त अहवालातील लेखा आक्षेपांवर या विभागाचे परिच्छेद निहाय प्रथम पुढील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

| **परिच्छेद क्रमांक** | **परिच्छेदाचा विषय** | **अनुपालनाची सदयस्थिती** | **विभागाचे प्रथम पुढील अभिप्राय** | **भार अधिभाराबाबत निर्णय** |
|---|---|---|---|---|
| | | ठरावासह अनुपालन सादर | अनुपालन स्वीकृत व आक्षेप निकाली काढण्यात येत आहे | निरंक |
| | | | त्रुटींचे निराकरण न केल्याने आक्षेप कायम | भार प्रस्तावित |
| | | | दोष क्षमापित करण्यात येऊ शकतील | अधिभार प्रस्तावित |
| | | | पुढील लेखापरीक्षणाच्या वेळी अथवा दिनांक ----- -----------रोजी पुन्हा तपासणी करण्यात येईल. | |
| | | अनुपालन सादर केले नाही. | आक्षेपांबाबत उचित कार्यवाही करणेबाबत आदेश व्हावेत,ही विनंती. | |

**(ठरावासह अनुपालन सादर झाल्यास)**

५. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १०(४) मधील तरतुदीनुसार सदर लेखापरीक्षण अहवाल १ महिन्याच्या आत संस्थेच्या कार्यालयात सर्व लोकांना पाहण्यास खुला ठेवण्याची तसेच त्याबाबतची नोटीस(सुचना) स्थानिक मराठी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याबाबत सुचना संबंधित प्राधिकरणास देण्यात यावी, ही विनंती. प्रसिध्दी न दिल्यास आपले स्तरावरुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १० (५) अन्वये कार्यवाही करुन या कार्यालयास कळवावे, ही विनंती.

अथवा

**(ठरावासह अनुपालन सादर न झाल्यास)**

५. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १०(४) मधील तरतुदीनुसार सदर लेखापरीक्षण अहवाल १ महिन्याच्या आत संस्थेच्या कार्यालयात सर्व लोकांना पाहण्यास खुला ठेवण्याची तसेच त्याबाबतची नोटीस(सुचना) स्थानिक मराठी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याबाबत सुचना संबंधित प्राधिकरणास देण्यात यावी, हि विनंती. प्रसिध्दी न दिल्यास आपलेस्तरावरुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १० (५) अन्वये कार्यवाही करुन या कार्यालयास कळवावे, ही विनंती.

आपला

सह संचालक/ सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
(विभागाचे नाव) / (जिल्हयाचे नाव)

प्रत:- १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ---------- /
मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपंचायत ----------
२. विभाग प्रमुख ---- विभाग जिल्हा परिषद --------/
गटविकास अधिकारी, पंचायत समिती
३. विभागीय सह संचालक ------ विभाग / सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (जिल्हयाचे नाव)